IMPACT FACTOR SJIS 2015 - 5.403

ISSN 2319-4766

SRJIS

# Issues of Farmers' Suicides in India : Past, Present and Future



**Editor**

**Dr. T. V. Munde**

Special Issue of an International

**SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES**

IMPACT FACTOR SJIF (2015) - 5.403

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| 123 | भारतातील शेतक-यांच्या आत्महत्याची प्रवृत्ती<br>*डॉ. रामनाथ सांगुळे & डॉ. विष्णू काळे* | 447-450 |
| 124 | नवीन आर्थिक धोरणाचा शेतकऱ्यांवर झालेला परिणाम<br>*डॉ.तिडके केशव दत्तराव* | 451-453 |
| 125 | भारतीय कृपीउत्पादन व वाढत्या शेतकरी आत्महत्या ( महाराष्ट्र राज्याचा एक चिकित्सक अभ्यास)<br>*डॉ. चंद्रशेखर गित्ते* | 454-457 |
| 126 | भारतातील शेतकऱ्यांच्या समस्या आणि उपाययोजना<br>*प्रा. दळवी वैशाली राजेंद्र* | 458-459 |
| 127 | शेतकरी आत्महत्या :कारणे आणि उपाययोजना<br>*अभय विष्णू मनसरे & डॉ.एन.एन.मुंढे* | 460-462 |
| 128 | भारतीय कृषीमधील समस्या<br>*संदिप गोरख साळवे & डॉ.व्ही.आर. कदम* | 463-465 |
| 129 | भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या कारणे व उपाय<br>*प्रा. जी.एन. सोनटक्के* | 466-468 |
| 130 | नविनआर्थिक धोरणाचा भारतीय शेती व शेतकऱ्यांवर झालेला परिणाम...<br>*प्रा.कांबळे के.जे.* | 469-472 |
| 131 | शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक विकासात पंचायतराज संस्थांची भूमिका<br>*प्रा. बाबासाहेब ग्यानदेव सोनवणे & प्रा. डॉ. मुळे एस.एस* | 473-476 |
| 132 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या समस्या व उपाय<br>*प्रा.गौतम कांबळे* | 477-478 |
| 133 | महाराष्ट्रातील शेतकरी व शेतमजूरांच्या आत्महत्या : स्वरूप, कारणे व उपाय<br>*प्रा. शिवाजी काकडे* | 479-482 |
| 134 | कर्जमाफी व महाराष्ट्रातील शेतकरी<br>*प्रा.डॉ. राजेंद्र एन. बोरसे* | 483-485 |
| 135 | शेतकरी आत्महत्येची कारणे, परिणाम व उपाययोजना<br>*प्रा.सौ. रणवीरकर एस.जी.* | 486-487 |
| 136 | विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या कारणे व उपाय<br>*प्रा.डॉ. विष्णु पांडुरंग कुटे* | 488-491 |
| 137 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या एक समस्या<br>*प्रा.कुकडे सुनिता जगन्नाथराव & डॉ.भिसे आर.एम.* | 492-497 |


Scanned with CamScanner

१३७.

# शेतकऱ्यांच्या आत्महत्या एक समस्या

**प्रा.कुकडे सुनिता जगन्नाथराव & डॉ.भिसे आर.एम.**

*समाजशास्त्र विभागप्रमुख, के.के.एम. महाविद्यालय, मानवत, जि.परभणी*

*समाजशास्त्र विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक, कै.दिगंबर बिंदू महाविद्यालय, भोकर, ता.भोकर जि. नांदेड*

**प्रस्तावना :**

स्वतंत्र भारतात दहा पंचवार्षिक योजना पूर्णत्वास गेल्या. भारताचा जयघोष केला जातोय. भारत जगात एक महासत्ता म्हणून उदयाला येत असल्याची सर्वत्र चर्चा आहे. एकीकडे अर्जून सेन गुप्ता समितीने संसदेला सादर केलेल्या अहवालात देशातील ७७ टक्के लोकांचे दररोजचे सरासरी उत्पन्न ९ रुपये ते २० रुपयाच्या आसपास असल्याचे स्पष्ट केले आहे. सामान्यतः कष्ट करणारी व्यक्ती आणि उच्चपदस्त कार्यकारी अधिकारी यांच्या दरमहा वेतनात १५००० ते २०००० पटीपेक्षा अधिक अंतर आहे.

विकासाच्या नावावर विषमता वाढविणाऱ्या विकासात वाढ होत असून सामान्य शेतकरी, शेतमजूर, रोजदारी कामावर, कष्टकरी, दलित, आदिवासींचे जीवन दिवसेंदिवस खूप हलाखीचे आणि कष्टप्रत होत चालले आहे. शेतीवर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांचे प्रमाण भारत स्वतंत्र झाला तेव्हा ८० टक्के एवढे होते ते आता ५५ ते ६० टक्क्यावर आले आहे? प्रसिध्द व नामवंत पत्रकार पी.साईनाथ यांच्या मताप्रमाणे हे प्रमाण येत्या काही वर्षात ३५ टक्क्यावर पोहोचेल.

भारताचे पूर्व अर्थमंत्री असलेले पी.चिदंबरम् यांच्या मताप्रमाणे देशात शेतीवर अवलंबून असणाऱ्यांचे प्रमाण केवळ १५ टक्के एवढे कमी करायचे आहे. म्हणजे आजच्या प्रचलित आकडेवारीप्रमाणे ४० टक्के शेतकऱ्यांचे काम करणार? त्यांना कोणता पर्याय उपजिवीकेसाठी देणार? या संबंधीचा कोणताही कृतिकार्यक्रम विद्यमान सरकारकडे नाही. यावरून शेतीकडे आणि पर्यायाने शेतकऱ्यांकडे पाहण्याची दृष्टी किती उपेक्षित व उदासिनतेची आहे हे दिसून येईल.

**आत्महत्येच्या व्याख्या :**

१. **बुसिल बेन्डोल,** "आत्महत्येची समस्या एक प्रकारे अशा समस्याच्या तीव्रतेचे समाधान आहे की समस्या सोडविण्यासाठी अन्य मार्गच नसतो.

२. **ईमाईल डरखाईम,** "प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष किंवा सकारात्मक वा नकारात्मक कृतीचा शेवट आत्मनाशात होतो अशी व्यक्तीकडून घडणारी कोणतेही कृती म्हणजे आत्महत्या होय" ते Le-suicide या ग्रंथात व्याख्या करतात.

आत्महत्या एक सामाजिक तथ्ये आहे. आत्महत्येची कारणे व्यक्तिगत शोधण्यापेक्षा समूहामध्ये शोधली पाहिजेत. आत्महत्येचे प्रकार अंहमवादी, परार्थवादी आणि प्रमाणक शून्यता आत्महत्या समाजात दिसून येतात. शेतकऱ्यांच्या आत्महत्या ह्या प्रमाणक शून्यतेतेतूनच दिसून येतात. समाजात आपले ध्येय, उद्दिष्टे साध्य होत नसेल, वारंवार अपयश येत असेल, दुःख, पचविण्याची सहशीलता किंवा क्षमता जर नसेल किंवा समूहापासून दूर जात असेल तर व्यक्ति विघटन होते आणि त्यातून समस्या निर्माण होते.

**उद्देश -**

१. शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा अभ्यास करणे.
२. शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या कारणांचे समाजशास्त्रीय विश्लेषण करणे.
३. मराठवाड्याच्या संदर्भात परभणी जिल्हयाचे तूलनात्मक आत्महत्येचे प्रमाण अभ्यासणे.

नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोचा ताजा अहवाल नुकताच प्रसिध्द झाला आहे. त्या अहवालानुसार गेल्या पंधरा वर्षात पावणेतीन लाख शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे नमूद केले आहे. तसा हा माणसे मरण्याचा आकडा



Scanned with CamScanner

कोणत्याही संवेदनशील माणसाची छाती दडवून टाकण्यास पुरेसा आहे. पण तसे होताना दिसत नाही. कोणत्याही नैसर्गिक आपत्तीत एवढ्या मोठ्या संख्येने माणसे मेली नाहीत. वादळ, भूकंप, महापुरातही एवढी माणसं मेली नसतील. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यामध्ये सुध्दा एवढी माणसं ब्रिटीशांनी मारली नाहीत. अमेरिकेने दुसऱ्या महायुद्धात नागासाकी आणि हिरोशिमावर केलेल्या बॉम्बहल्ल्यात सुध्दा इतकी माणसे मेली नसावीत?

गेल्या पंधरा वर्षात पावणेतीन लाख शेतकऱ्यांनी आत्महत्या केलीय. तीळ तीळ जीव तुटावा तसा शेतकरी कणाकणाने क्षणाक्षणाला मरतो आहे. २६/११ च्या मुंबईवरील हल्ल्यात काही माणसं मारली जातात तर सारा देश हळहळतो. हल्ल्यात ठार झालेल्यासाठी मेणबत्या लागतात. सचिन तेंडूलकरला आपल्या शतकातील एक शतक या ठार झालेल्यांना श्रध्दांजली म्हणून अर्पण करावेसे वाटते का? पण गेल्या पंधरा वर्षात पावणेतील लाख शेतकरी आत्महत्या करतात पण त्यांच्या विषयी कोणालाही काही वाटत नाही. उलट त्यांच्या मरण्याची टिंगलटवाळीच अधिक होतांना दिसत आहे. पण शेतकऱ्यांच्या बाबतीमध्ये हा विधिनिषेध कोणी पाळतांना दिसत नाही. तो आत्महत्या का करतो? या कारणाचा शोध न घेताच त्याच्या आत्महत्येचे खापर त्यांच्याच माथ्यावर फोडून आपण मात्र नामानिराळे होत असतो. तो दारूच पितो, तो आळशीच आहे, त्याला अक्कलच नाही. तो आपल्या मुलामुलींच्या लग्नात खर्चच जास्त करतो. एकूण काय तर त्याच्या आत्महत्येस तोच जबाबदार? त्याच्या आत्महत्येनंतर त्याला एक लाख रुपये मिळतात म्हणून तो आत्महत्या करतो. असे म्हणणाऱ्या माणसांचीही संख्या काही कमी नाही. सिनेमा, राजकारण, नोकरदार, उच्चभ्रू वर्गात सर्वाधिक दारूचा वापर आहे. पण कोणी आत्महत्या करीत नाही.

महाराष्ट्रातील आत्महत्या, दरदिवशी देशात होणाऱ्या आत्महत्या तूलनेत वाढत आहे. अशा या भिषण आणि भयावह घटनेची सर्व स्तरातून माहिती व्हावी. शेतकऱ्यांचे प्रश्न, त्याच्या अडचणी जाणून घेणे अत्यावश्यक आहे. म्हणून डॉ.क्लाऊटन "भारतात स्पृश्य अस्पृश्यता आणि मागास जाती तर आहेत त्या बरोबरच मागास उद्योगधंदे सुध्दा आहेत. दुर्दैवाने शेती त्या पैकी आहे." म्हणून भारतातील शेतकरी कर्जात जन्मतो आणि कर्जात मरतो.

**तक्ता क्र.१ मराठवाडा व परभणी जिल्ह्यातील तूलनात्मक शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण**

| इ.सन. | मराठवाड्यातील आत्महत्येची संख्या | परभणी जिल्ह्यातील आत्महत्येची संख्या | तूलनात्मक % |
|---|---|---|---|
| २०१४ | ५४७ | ७० | १२.१९ |
| २०१५ | ११०९ | १०० | ९.०१ |
| २०१६ | ७०४ | ६४ | ९.०९ |
| | | सरासरी | १०.२९ |

(दै. दिव्य मराठी, २८ ऑगस्ट २०१६)

वरील आकडेवारीवरून मराठवाड्याच्या तूलनेत परभणी जिल्ह्यातील प्रमाण १०.२९ दिसून येते.

१९९० च्या दशकानंतर जगामध्ये खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरणाचे वारे वाहू लागले. पी.व्ही. नरसिंहराव प्रधानमंत्री आणि डॉ.मनमोहनसिंग अर्थमंत्री असताना ते वारे आपल्या देशाच्या उंबरठ्यावर येऊन धडकले. म्हणून १९९२ पासून आपली अर्थव्यवस्था खुली करण्यात आली. 'खाऊजा' या धोरणांचा स्वीकार करण्यात आला. देशातील शेतकरी, शेतमजूर यांना खूप मोठमोठी स्वप्ने दाखविण्यात आली.

'खाऊजा धोरण' स्वीकारल्यानंतर 'गॅट करारावर' स्वाक्षरी झाल्यानंतर सर्वच क्षेत्रात खाजगीकरण्याचे कार्पोरेटशाहीचे विशेष आर्थिक क्षेत्राचे (सेझ), बिल्डर लॉबीचे प्रभावक्षेत्र वाढत गेले. शहरीकरणामुळे पिकाखाली येणारी हजारो हेक्टर उपजाऊ जमीन उद्ध्वस्त झाली. शेतीप्रधान देशात शेतकऱ्याला विस्थापित व्हायची वेळी आली. १९९५ पर्यत देशात एकाही शेतकऱ्याने आत्महत्या (स्वहत्या) केली नव्हती. परंतु मागील काही वर्षात शेतकरी आत्महत्येची आकडेवारी दोन लाखाच्याही पुढे गेली आहे. देशात एकानंतर एक असे शेतकरी आत्महत्येची सत्र सुरु झाले आहे. शेतकरी आत्महत्या आणि उपाययोजना, आत्महत्या आणि विकास योजना,



Scanned with CamScanner

आत्महत्या आणि भारत महाशक्ती बनण्याची संकल्पना यांचा परस्परांशी अनुबंध आहे काय? असेल तर त्याची चर्चा होऊन ती उपाय योजना व्हायला हवी.

अन्नधान्य उत्पादनाचा मुलाधार असलेला एक शेतकरीही आत्महत्या करत असेल तर तो देशासाटी कलंक आहे. परंतु ही मानसिकता देशात आढळत नाही. शेतकरी आत्महत्या हा ऐरणीवरील विषय वाटत नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्येची गंभीरपणे दखल घेतली जात नाही. शासन, प्रशासन, राजकीय पक्ष, सामाजिक संस्था, प्रसारमाध्यमे या सर्वांना या विषयाकडे उपेक्षेने पाहिले जात आहे. त्यांना अन्य प्रश्न अधिक महत्त्वाचे वाटतात. शेतकरी वर्ग असमंजस आणि गोंधळलेल्या अवस्थेत आहे. शेतकऱ्यांचे प्रबळ संघटन देशपातळीवर अस्तित्वात नसल्यामुळे त्यांच्या मुलभूत प्रश्नांना वाचा फूटत नाही. शेती आणि शेतकरी उद्ध्वस्त करण्याचीच नीती दिसून येते. शेती आणि शेतकऱ्यांचे प्रश्न स्थानिक स्वरुपाचे नसून त्याची नाळ जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण आणि आर्थिक धोरणाशी निगडीत आहे. भारतातील शेतीत काय पेरावे आणि काय पेरू नये हे जागतिक बँक ठरविते. स्वातंत्र्यापासून आतापर्यंत शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नाकडे अक्षम्य दुर्लक्ष झाले आहे. सर्वच पक्षातील राजकीय नेत्यांची मानसिकता शेतकऱ्यांच्या प्रश्नासंबंधी कचखाऊ असल्यामुळे शेतकऱ्यांना सामाजिक, आर्थिक न्यायापासून दूर लोटले जात आहे.

शेतकऱ्यांच्या आत्महत्येची सार्थ आणि समर्पकपणे चर्चा करणारे कमी आहेत. जे चर्चा करतात त्यांच्यातही भिन्न-भिन्न छटा आहेत. शेतकऱ्यांना दोष देण्यापासून ते व्यवस्था परिवर्तन करण्याची आवश्यकता प्रतिपादन करण्यापर्यंतचे मुद्दे मांडले जातात. परंतु ठोस उपाययोजना केली जात नाही. शेतकऱ्यांवर निरंतर वाढणारे सरकारी आणि सावकारी कर्ज, शेती मालास खर्चावर आधारित भाव न मिळणे, रासायनिक शेतीचे दुष्परिणाम, पावसाचे दुर्मिक्ष, कसदार जमिनीची सतत होणारी धूप इत्यादी अनेक कारणाने शेती आणि शेतकऱ्यांचे प्रश्न जटील बनत चालले आहेत.

भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या करणांची आकडेवारी नॅशनल क्राईम ब्युरो च्या माहितीनुसार वर्गीकरण खालील प्रमाणे

तक्ता क्र.२

| अ.क्र. | आत्महत्येची कारणे | २०१४ | २०१५ | % |
|---|---|---|---|---|
| १ | कर्जबादारीपणा | ११६३ | १५३ | ३.४१ |
| २ | कौटुंबिक समस्या | ११३५ | १८४३ | ४०.१ |
| ३ | शेतकरी संबंधीत समस्या | ९६९ | ४५९५ | २७.६ |
| ४ | इतर कारणे | ८३५ | ५८५ | १३ |
| ५ | आजार | ७४५ | ८७२ | १९ |
| ६ | मद्यपान/नशापान | २५० | ३१२ | ६.८ |
| ७ | माहित नसलेले कारण | २३१ | २८१ | ६ |
| ८ | गरिबी | १४९ | १७८ | ३.९ |
| ९ | विवाहसंबंधीत कारणे | १२१ | ९० | २ |
| १० | सामाजिक प्रतिष्ठा | ७ | - | - |
| ११ | जमिनीचे विवाद | - | ९३ | २.१ |
| १२ | अर्थसंस्था | - | १५३ | ३.४ |
| १३ | पैसा | - | ९९ | २.२ |

नॅशनल क्राईम ब्युरोच्या २०१४, २०१५ च्या सर्वेक्षणानुसार असे लक्षात येते की, शेतकरी आत्महत्येसाठी अनेक घटक कारणीभूत आहेत. सर्वात जास्त आत्महत्येचे कारण कर्जबाजारीपणा आढळून आला. त्यानंतर कौटूंबिक समस्या व शेतविषयक समस्या कारणीभूत ठरतात. काही बाबतीत शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे कारणेच समजू शकले नाहीत. आजारपणाला कंटाळून बऱ्याच शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे आढळते. मद्यमान, नशापान, धूम्रपान केल्यामुळे वाईट व्यसनाच्या अधीन राहून आत्महत्या करण्यास प्रवृत्त झालेले आढळतात. बरेच शेतकरी गरिबी व दारिद्र्याला कंटाळून आत्महत्या करणारे शेतकरी, त्याचबरोबर मुलींच्या विवाहाच्या समस्या मध्ये मुलींच्या



Scanned with CamScanner

विवाह जमणारे व विवाह न जमणाऱ्या मुलींच्या समस्येमुळे व हुंडा प्रतिष्ठेचे लक्षण मानणाऱ्यामध्ये घटस्फोट, जमिनीच्या संपत्ती विवादामुळे आत्महत्येचे प्रमाण दिसून आले. लोकविधी विज्ञान विकासाच्या सिध्दांतात योगदान देणारे समाजशास्त्रज्ञ गारफिन्कल म्हणतात, "समाजात समायोजन न करणारे किंवा सामाजिक घटनांना न जाणून घेणारे व्यक्ती आत्महत्येस प्रवृत्त होतात वा बळी पडतात."

**शेतकरी आत्महत्येची कारणे :**

१) **बेभरवशाचा मान्सून :**

आपल्या देशात जून ते सप्टेंबर या चार महिन्याच्या काळात ईशान्य मान्सून वाऱ्यांपासून पाऊस पडतो पण तो नियमित पडत नाही. कोणत्या वर्षी अत्यल्प, कोणत्या वर्षी अतिवृष्टी यामुळे कृषीप्रधान शेतकरी अडचणीत सापडतो. दुबार, तिबार पेरणी करूनही शेतात काहीच उगवत नाही मग तो खचून जातो.

२) **जलसिंचनाचा अभाव व अपुऱ्या जलसिंचन सुविधा :**

बेभरवशाच्या मान्सूनमुळे शेतीला पाणी मिळत नाही. म्हणून देशामध्ये जलसिंचन क्षमता खूप कमी आहे. आपल्या राज्यात केवळ १८ टक्के सिंचन व्यवस्था आहे. संपूर्ण देशामध्ये ४१ टक्के सिंचन क्षमता आहे. म्हणून अल्पवृष्टीच्या काळात पिकांना पाणी देत येत नाही. जलसिंचनासाठी ठिबक सिंचन, तूषार सिंचन याचाही शेतकऱ्यांकडे अभाव आहे. म्हणून तो शेतातील पिकांना मपतांना पाहून तीळ-तीळ तूटत असतो.

३) **सावकारी कर्ज :**

दुबार, तिबार पेरणीची वेळ आल्याने शेतकऱ्यांना सावकाराकडून कर्ज काढावे लागते. दरमहा दहा ते वीस टक्के व्याजदराने कर्ज काढूनही शेतात पीक येईल याचा भरवसा नाही. आलेल्या पिकास चांगला बाजारभाव मिळेल याची शाश्वती नाही. सावकारी कर्जाचा फास मानेभोवती कधी आवळला जातो हे त्याला कळत नाही. मग त्याला हे जग नकोसे व्हायला लागते.

४) **नैसर्गिक आपत्ती :**

देशातील मान्सून हा बेभरवशाचा आहे. शेती हाच मुळात जुगार झालाय. कधी काय नैसर्गिक आपत्ती येईल याचा भरवसा नाही. कधी अल्पवृष्टी, कधी अवकाळी, कधी गारपीट, कधी किडींचा प्रादूर्भाव यामधून तो बळीराजा सावरत नाही.

५) **शेतमालास भाव :**

आपल्या देशात जो उत्पादन करतो तोच भाव ठरवतो. पण दुर्देवाने शेतकऱ्यांच्या मालाचा भाव त्याला ठरविण्याचा अधिकार नाही. दलालामार्फत त्याच्या मालाचा भाव ठरतो. आणि शेतमालाच्या उत्पादित मालाचा सगळा फायदा मध्यस्थ किंवा दलालांचा होतो. म्हणून उत्पादन करणारा शेतकरी दरिद्री आणि दलालांचा व्यापारी वर्ग श्रीमंत अशी दशा आपल्या देशात आहे. म्हणून शेतकऱ्यांच्या मालाचा भाव ठरविण्याचा त्याला अधिकार असला पाहिजे.

६) **वाढती लोकसंख्या :**

शेतकऱ्यांच्या अज्ञानामुळे त्याच्या घरी खाणारी तोंडे जास्त आणि कमविणारे हात कमी अशी अवस्था कधी कधी होते. म्हणून वाढत्या लोकसंख्येला लागणाऱ्या जीवनावश्यक गरजा पूर्ण करण्यात बरीच शक्ती खर्च करावी लागते. यातून जमा आणि खर्चाचा ताळा जुळत नाही. अशा वेळी त्याची खूप ओढाताण होते.

७) **शेतीला पूरक जोडधंद्याचा अभाव :**

शेतकरी बऱ्याच वेळी केवळ शेतीवरच अवलंबून राहतो. शेतीला पूरक जोडधंदा तो करत नाही. उदा. शेळीपालन, मेंढीपालन, कुकुटपालन, मत्स्यशेती, भाजीपाला, फूलशेती, वराहपालन, यमुपालन अशा अनेक जोडधंद्यातून भरून काढता येते. मग अवर्षण, अतिवृष्टी, आपत्ती याचा सामना करणे सहज शक्य होऊ शकते.

८) **हुंडापध्दती :**

हुंडापध्दत ही अतिशय निच पातळीवरची मानसिकता दर्शक सामाजिक वाईट रुढी आहे यानुसार विनाकारण वधुपित्याला लग्नाच्या पवित्र संस्कारातही नागवले जाते. कधी कन्यादान म्हणून कधी लग्नखर्च म्हणून, कधी मानापमान म्हणून वधूपित्याला नेस्तनाबूत करणारी ही अत्यंत वाईट परंपरा आहे. १९६१ साली संसदेचे


Scanned with CamScanner

संयुक्त अधिवेशन बोलावून 'हुंडा प्रतिबंधक कायदा-१९६१' करण्यात आला, पण त्याचा फारसा परिणाम समाजमनावर दिसत नाही. यातून वधूपिता मात्र हताश आणि निराश होतो.

९) **बी-बियाणे व रासायनिक खतांचा अभाव** - शेतकऱ्यांना पेरणीसाठी चांगल्या दर्जाचे बी-बियाणे मिळत नाहीत. तो शेतात निकृष्ट दर्जाचे बियाणे वापरतो. त्याची फसवणूक होते. याचा परिणाम शेतमालावर होतो. रासायनिक खते पुरेसे प्रमाणात त्याला उपलब्ध होत नाहीत. म्हणून शेतीमध्ये पिकांची चांगली वाढ होत नाही. पर्यायाने शेतीतून नफा मिळण्यावर मर्यादा येतात.

१०) **एक पिकपध्दती :**

शेतकरी शेतामध्ये पावसाअभावी आणि सिंचनाअभावी एकच पिक शेतात घेतो. ते पीक अनेक कारणांनी कधी-कधी हाती येत नाही. दुबार पिकाची व्यवस्था नसल्याने त्याचा तोटा संपूर्ण कुटुंबावरयेतो. यातून खूप समस्या निर्माण होतात. आंतरपिक पध्दतीचा वापर केल्यास बरेचदा शेतकरी फायद्यात राहतो. किमान एक पीक तरी त्याला तारण नेते.

११) **भ्रष्टाचारी व्यवस्था :**

भ्रष्टाचारी राजकीय व्यवस्थेमुळे शेतकऱ्यांसाठीची मदत त्याच्यापर्यंत पोहोचत नाही. मधल्या दलांच्या साखळीत सरकारी मदत अडकते. १९८५ साली प्रधानमंत्री राजीव गांधी असे म्हणतात, "आम्ही जर शेतकऱ्यांसाठी एक रुपया पाठवत असू तर त्या एक रुपयापैकी केवळ पंधरा पैसे प्रत्यक्ष शेतकऱ्यास मिळतात. उर्वरित ८५ पैसा या भ्रष्टाचारी व्यवस्थेत गडप होतात."

या दुष्टचक्रातून शेतकरी वर्गाला वाचवायचे असेल तर काही उपाय आपणास करावे लागतील.

**उपाय -**

१) **सेंद्रीय शेतीचा वापर :**

रासायनिक खताच्या अतिरिक्त वापराने जमीनी नापिक झाल्या आहेत. याला प्रतिबंध म्हणून सेंद्रीय शेतीकडे शेतकरी वर्गाने वळायला हवे. कमीत कमी खर्चातून अधिकाधिक फायदा करता येतो.

२) **जोडधंदा व कुकुटपालन व्यवसायास प्राधान्य :**

केवळ शेती व्यवसाय करून उपजिविका करणे या काळात फार कठीण आहे. कारण अनेक वेळा हाताशी आलेले पीक पदरात पडत नाही. म्हणून शेतीला एखादा जोडधंद्याची जोड दिल्यास शेतीतील नुकसान काही प्रमाणात शेतीपूरक व्यवसायातून भरून काढता येते. म्हणून जोडधंदा करून शेती करणे फायद्याचे ठरते.

३) **सिंचन सुविधा :**

शेतीसाठी सिंचनाची व्यवस्था केल्यास शेती ही फायद्याची ठरते. म्हणून तुषार सिंचन, ठिबक यासाठी प्राधान्याने विचार करणे आवश्यक आहे. देशपातळीवर सिंचन क्षमता निर्माण करणे हे खूप अत्यावश्क आहे.

४) **पीक पध्दतीत बदल :**

पारंपरिक शेतीच्या ऐवजी आधुनिक शेती करणे फायद्याचे ठरते. पारंपरिक पिकापेक्षा नवनीन पिकांचा समावेश शेतीत करणे आवश्यक आहे. पारंपरिक ऊस पिकाच्या ऐवजी नवनवीन कमी पाण्यावर, येणाऱ्या पिकांची निवड करून लागवड करावी.

५) **आधुनिक शेती पध्दतीचा स्विकार :**

आपल्या देशात पारंपरिक पध्दतीने शेती करणारे शेतकरी मोठ्या प्रमाणात आहेत. म्हणून शेती करत असताना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती केल्यास फायदा होतो. बराचसा खर्च आणि वेळ आधुनिक शेती तंत्रज्ञानाच्या वापरातून वाचवता येतो.

६) **शेतकऱ्यांमध्ये सामाजिक घटकांची जाणीव निर्माण करणे :**

शेतकऱ्यांनी सामूहिक शेतीची निर्मिती करणे, शेतकऱ्यांना आधुनिक परिस्थितीनुसार कृषी महोत्सव कार्यशाळा आयोजन करावे, मृदापत्रिकेचे नियोजन, पावसाच्या पाण्याचे नियोजन, शेतीक्षेत्रासंबंधी संशोधन, पारंपरिक पध्दतीचा त्याग, शेतकऱ्यांचा अवाजवी खर्च टाळणे, शेतकऱ्यांना प्रशिक्षण, मार्गदर्शन, शेतीसंबंधीचे नियमने व कायदे, शेतकऱ्यांच्या मुलांमुलींना मोफत शिक्षण, वस्तीगृहाच्या सुविधा, वधूवर सूचक मेळावे, वधूवर



Scanned with CamScanner

परिचय मेळावे, सामुहिक विवाह पध्दती, कौटुंबिक सल्ला समुपदेशक केंद्र, कुटुंबातील सदस्यांना लघू उद्योगासाठी कर्ज, विमा पॉलिसी, नोकरीची सुविधा अन्यथा लघु उद्योगाचे प्रशिक्षण, महिला बचत गट, शेतकऱ्यांच्या मुलींनी शिक्षण घेऊन सामाजिक परिवर्तन प्रक्रियेत सहभाग, कौटुंबिक छळ वा हिंसाचाराचे प्रतिबंधात्मक प्रशिक्षण, कार्यशाळा, आयोजित करून जाणीवजागृती निर्माण करणे यातून समाज परिवर्तन होऊन आत्महत्येची तिव्रता कमी होण्यास निश्चितपणे मदत होईल.

**निष्कर्ष :**

दैनिक दिव्य मराठी २०१६ वर्तमानपत्राच्या संकलीत माहितीनुसार मराठवाड्यातील एकूण शेतकऱ्यांच्या आत्महत्यापैकी जवळपास १० % आत्महत्या परभणी जिल्ह्यात होतात.

नॅशनल क्राईम ब्युरो च्या सर्वेक्षणानुसार दरवर्षी अनेक उपाय योजना करून सुध्दा शेतकरी आत्महत्येचे प्रमाण वाढतच आहे.

देशामध्ये मागील काही वर्षात खूप शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या ही चिंतेची बाब आहे. याकरिता कारणीभूत ठरतात ते म्हणजे दुष्काळ, पतपुरवठा, सरकारी धोरण, जलसिंचन अभाव, सावकारी कर्ज, असमान बाजारभाव, वाढती लोकसंख्या, हुंडापध्दत, शेतीपूरक जोडधंद्याचा अभाव, खाऊजा धोरण, वाढता कौटुंबिक खर्च, बि-बीयाणे व खते, एकपिकपध्दती, भ्रष्ट व्यवस्था, शिक्षण व बेरोजगारी या व अशा असंख्या कारणांनी बळीराजाचा बळी जातो आहे. म्हणून शेती अर्थसंकल्प, शेती धोरणात बदल पीक पध्दतीत बदल, जलसिंचन वाढ, शेती उद्योग, दर्जा, पूरक व्यवसाय, आधुनिक शेती, सेंद्रिय शेती, पीक कर्जाचा दर चार टक्के असावा, कर्जात अडकलेल्या सर्व शेतकऱ्यांचे कर्ज माफ करावे, अशा अनेक उपायातून शेतकरी आत्महत्या थांबवणे शक्य आहे.

शेतकरी हा देशाचा कणा आहे म्हणून शेतकरी सन्मानाने जगला पाहिजे. यासाठी सर्व स्तरातून शेतकरी समस्या जाणून त्याची सोडवणूक करणे आवश्यक आहे. कृषी प्रधान देशातील बळीराजाचा बळी दिला जातोय या चक्रातून शेतकऱ्यांची सुटका करणे आवश्यक आहे. आजचा शेतकरी संघटीत नसल्याने त्यांच्या समस्या जगापुढे येत नाहीत त्यामुळे त्याला न्याय मिळत नाही. जर संघटीत झालाच तर हे राज्यकर्ते त्यांच्या संघटीतपणावर घाव घालतात कारण शेतकऱ्यांनी संघटीत होऊ नये यातच त्यांचे हित आहे. शेतकरी संघटीत झाल्यास स्वतंत्र स्वतःच्या मालाचा भाव स्वतः ठरू शकतो. त्याने सहकाराकडे पाठ फिरवली तर राज्यकर्त्यांच्या चुली बंद पडतात. आतापर्यंत केंद्र व राज्य सरकारच्या धोरणाचे बळी शेतकरी ठरले आहेत. आपत्ती निवारण कायद्यात दुष्काळ, गारपीट, वादळ, वारा, वीज, या बाबी अंतर्भूत करून शेतकऱ्यांना संरक्षण देणे गरजेचे आहे. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबाचे पुनर्वसन करणे आवश्यक आहे. शासनाने धोरणे बदलून शेतकऱ्यांकडे एक 'माणूस' म्हणून पाहणे आवश्यक आहे. तरच या समस्येवर आपणास मात करता येईल.

**संदर्भ साहित्य -**

*महाराष्ट्र टाईम्स दैनिक*
*शेतकरी साहित्य - सिंहावलोकन*
*दैनिक सकाळ - अॅग्रोवन*
*शेतकऱ्यांच्या आत्महत्या - कारणे व उपाय*
*दै. पुढारी - शेतकरी आत्महत्या कारणे व उपाय आणि दायित्व - गुजर उदय*
*शेतकरी आत्महत्येनंतर तज्ञांची मुक्ताफळे - आर्वीकर अभ्य, भुटे गंगाधर*
*दै. पुण्यनगरी*
*राखेखालचे निखारे - दै. लोकसत्ता, २०१३, जानेवारी २३, जोशी शरद*
*जगण्याचा संघर्ष - वैष्णव व्यंकटेश, बीड*
*दै. लोकमत - संघर्षाचा शेवट, १७ जुलै २०१४*
*डॉ.दत्ता देशकर - बळीराजा सावध हो, दुष्काळ भेडसावतोय, जलसंवाद प्रकाशन, पाणी व्यवस्थापन, विस्तार शिक्षण संचालनालय.*
*डॉ.उत्तम इंगळे - मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी*
*जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी*
*वैद्य वर्षा - भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या समस्या ८ उपाय, सरसाहित्य केंद्र, नागपूर*
*समाजप्रबोधन पत्रिका*
*नॅशनल क्राईम ब्युरो अहवाल २०१४, २०१५.*
*डॉ.डी.डी. शर्मा व प्रा.एम.एल. गुप्ता, प्रतियोगिता साहित्य शिबीर, प्रकाशन साहित्य भवन, दिल्ली.*



Scanned with CamScanner